श्री

## चित्पावन मोडक कुल संमेलन नाशिक,सन २०१४ चा वृत्तांत

चित्पावन मोडक कुल संमेलन रविवार दि. २० एप्रिल २०१४ रोजी गद्रे मंगल कार्यालय नाशिक येथे सर्वश्री महादेव केशव, अजित मनोहर, विद्याधर शशिकांत, व्यंकटेश रामचंद्र,मिलिंद चंद्रशेखर व अन्य नाशिककर बंधु भगिनींच्या अथक परिश्रमाने आयोजित केलेल्या कुल संमेलनास सुमारे १२५ मोडक कुलबंधू/भगिनी उपस्थित होते. सकाळी ९ वाजता उपस्थितांची नोंदणी करून त्यांचे अल्पोपहार व चहा पानाने स्वागत करण्यात आले.

श्री चंद्रशेखर गंगाधर जेष्ठ विधिज्ञ यांची अध्यक्ष स्थानी निवड करण्यात आली.श्री अशोक गजानन व दीपक नारायण हे प्रमुख पाहुणे होते.अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते श्री परशुराम पूजन व दीप प्रज्वलन झाले. ईश स्तवना नंतर कार्यक्रमास सुरवात झाली.श्री श्रीधर वामन यांच्या प्रस्तावने नंतर श्री अरविंद वामन यांनी कुल न्यासा विषयी माहिती सांगितली. प्रमुख पाहुणे श्री अशोक गजानन यांनी "कुल संमेलनांची आवश्यकता" या विषयावर आपले विचार मांडले. नाशीक् हे श्री रामांचे वास्तव्य स्थान असल्याने श्री रामावरील विविध गाणी व नृत्य स्थानिक कलाकारांनी सदर केले. सौ. रेखा नाडगौडा व सौ.अनुराधा राजाध्यक्ष या माहेरवाशीणी भगिनींनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या नंतर सर्वांनी रुचकर भोजनाचा आस्वाद घेतला.

भोजनोत्तरचे सत्रात श्री दीपक नारायण (मुख्य अभियंता कोयना धरण),यांनी कोयना धरणात जे लेक टॅपिंग केले त्याची व्हिडिओ फिल्म दाखवली. ते पाहून सर्व उपस्थित भारावून गेले. त्यानंतर  श्री चंद्रशेखर गंगाधर जेष्ठ विधिज्ञ, श्री अशोक गजानन माजी आमदार, श्री दीपक नारायण मुख्य अभियंता कोयना धरण,श्री वैभव गणेश शेती पूरक यंत्राची निर्मिती, सौ. रेखा नाडगौडा नृत्यांगना, सौ.अनुराधा राजाध्यक्ष अभिनेत्री व सौ.चित्रा गाडगीळ उद्योजिका यांचे सत्कार करण्यात आले.

सन २०१३ मधील १० वी व १२ वी च्या परीक्षेत कुलातील ८० टक्क्या पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या चि.अनिरुध्द सुनील (कल्याण),कु.मैत्रयी सुहास (डोंबिवली) व कु यशस्वी प्रकाश (भोपाळ) यांना रोख पारितोषिके देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच माहेरवाशीणींच्या ओट्या भरण्यात आल्या. त्यानंतर परस्पर परिचय करून घेण्यात आले. राष्ट्र गीताने संमेलनाची सांगता झाली.